पुणे जिल्हा परिषद, पुणे
"शिक्षण विभाग (प्राथमिक)
यशवंतराव चव्हाण भवन"
जा.क्र. जिप/शिक्षण/प्राथ/२/२१/कुम/२००३
पुणे दिनांक:- ३/३/२००३

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
~~कॅम्प एज्युकेशन सोसायटीची~~
~~इंग्लिश प्राथमिक शाळा पुणे-१~~

Inward 25/2002-2003
Date 3/3/2003

विषय:- इंग्रजी माध्यमाच्या "कायम विनाअनुदान तत्वावरील" शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्याप्रथम/जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. [माध्यम-इंग्रजी]

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दिनांक:- १४ जानेवारी २००३.

वरिल विषयासंबंधिचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गीक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग जून-२००२ पासून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी जादा | वाढ नैसर्गीक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | कॅम्प एज्यु. सोसा. उर्दू, इंग्रजी प्राथ. शाळा पुणे-१ | इंग्रजी | इ १ ली ची २ री तुकडी | | जादा | मंजूर/ ~~नामंजूर~~ |

अटी व शर्ती
===========

१] शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहीजे.

२] सदर शाळेने तुकडयासाठीसर्व भौतीक सुविधातसेच शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहीजे.

३] सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.

७] तपासणी अंती एक जरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करणेत येईल.

स्वाक्षरित

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे-१

स्वतः प्रतिवर शिक्षणाधिकारी
जि. प. पुणे यांची सही आहे

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहिसाठी रवाना.

१] सचिव/अध्यक्ष,
कॅम्प एज्यु सोसा. २०१५ स्ट्री. पुणे-१